महाराष्ट्र शासन

आयुक्त

**वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य**

४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१

दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in


क्र.सवैशिवस/प्रवेश फी/आकारणी/शिष्यवृत्ती/२०२४ दिनांक 23/08/2024

प्रति,

अधिष्ठाता/प्राचार्य

शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्गंत आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाची सर्व महाविद्यालये

महाराष्ट्र राज्य

**विषय- आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिक दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थ्यीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत**

कृपया वाचावे:-उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/ तांशि-४ दिनांक ०८ जुलै, २०२४

संदर्भ-१. शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१६/प्र.क्र.४७३/१६/शिक्षण-२ दि. ०३ मे, २०१८

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र. २०७/ तांशि-४ दिनांक १९ जुलै, २०२४

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे शासनाने निर्देश देण्यात आलेले आहे. *"आरोग्य विज्ञानच्या पदवी (UG) अभ्यासक्रमांस प्रवेशीत विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शासनाने/सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यावर जमा करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्याने संबंधीत महाविद्यालयास अदा करावयाची आहे. त्यामुळे आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात प्राप्त होणाऱ्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम त्यांच्या महाविद्यालयास प्रवेशाच्या वेळी अदा करणे आवश्यक नाही. आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी देखील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात अनुज्ञेय होणारी शिक्षण शुल्काच्या रकमेचा भरणा प्रवेशाच्या वेळीच करण्याबाबत विद्यार्थ्यांकडे आग्रह धरु नये वा त्याकरीता विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास*

*टाळाटाळ करु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळीच शिक्षण शुल्काच्या संपुर्ण रकमेचा भरणा करण्याबाबत आग्रह धरल्यास वा तशी मागणी केल्यास अशा महाविद्यालयांविरोधात कारवाई करण्यात येईल."*

तसेच संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवीस (UG) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिक दुर्बल घटक (EWS), व सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने संबंधित महाविद्यालयांना पुढील प्रमाणे कळविण्यात येत आहेत.

१. सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे. त्यांचेकडून प्रवेशाच्यावेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा.

२. ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेऊन, त्यांना प्रवेश देण्यात यावा.

३. शैक्षणिक संस्थांनी योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देऊन, संबंधित योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरण्याबाबत कळवावे.

४. वरील सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

५. सदर परिपत्रक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याकरीता प्रयत्न करण्यात यावेत व परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी द्यावी.

६. प्रथम वर्षाशिवाय इतर पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणारे विद्यार्थी शिष्यवृत्तीकरीता पात्र होत असतील तर त्यांच्याबाबतही उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

वरिलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता महाविद्यालयाकडून घेण्यात यावी.

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष
महाराष्ट्र राज्य

(१)

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन परिपत्रक क्रमांक एमईडी १०१६/प्र.क्र.४७३/१६/शिक्षण-२**

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

**दिनांक :०३ मे,२०१८**

वाचा : १) शासननिर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- टीईएम२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३.१०.२०१६

२) शासननिर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक- एमईडी१०१६/ प्र.क्र. ४७३/ १६/ शिक्षण-२, दिनांक ०९.१२.२०१६

३) शासननिर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- टीईएम२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५.०४.२०१७

४) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक- ईबीसी २०१८/ प्र. क्र. ३८ /तांशि-४, दिनांक १४.०२.२०१८

५) शासननिर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक- एमईडी १०१८/ प्र.क्र. ४९/ १८/ शिक्षण-२, दिनांक१७.०४.२०१८

परिपत्रक:-

राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न विहीत केलेल्या मर्यादेत आहे अशा विद्यार्थ्यांना काही अटी व शर्तीसह शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रकमेची प्रतिपुर्ती करण्याकरीता "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेस" संदर्भाधीन क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने, राज्यातील शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक पदवीपुर्व अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेचा" लाभ

मिळावा या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक २ वरील शासननिर्णयान्वये पुरक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच, शासकीय/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एमबीबीएस व बीडीएस अभ्यासक्रमांस प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या दरम्यान आहे, अशा विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या रकमेच्या प्रतीपुर्ती ऐवजी शासनाने/सक्षम प्राधिकरणाने संबंधीत अभ्यासक्रमांकरीता विहीत केलेल्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात देण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक ५ वरील शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. संदर्भाधीन क्रमांक ३ वरील शासननिर्णयान्वये "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेचे" नामकरण "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" असे करण्यात आले आहे. तसेच, सदर योजनेंतर्गत शासनाने/ सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बॅक खात्यावर जमा करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्याने संबंधीत महाविद्यालयास अदा करावयाची आहे. त्यामुळे आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात प्राप्त होणाऱ्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम त्यांच्या महाविद्यालयास प्रवेशाच्या वेळी अदा करणे आवश्यक नाही. आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी देखील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन त्यांना शिष्यवृत्ती स्वरुपात अनुज्ञेय होणारी शिक्षण शुल्काच्या रकमेचा भरणा प्रवेशाच्या वेळीच करण्याबाबत विद्यार्थ्यांकडे आग्रह धरु नये वा त्याकरीता प्रवेश करण्यास टाळाटाळ करु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळीच शिक्षण शुल्काच्या संपुर्ण रकमेचा भरणा करण्याबाबत आग्रह धरल्यास वा तशी मागणी केल्यास अशा महाविद्यालयांविरोधात यथायोग्य कारवाई करण्यात येईल.

३. "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" प्राप्त होणाऱ्या शिक्षण शुल्काच्या शिष्यवृत्ती रकमेचा भरणा प्रवेशाच्या वेळीच करण्याबाबत शिक्षण संस्थांनी आग्रह धरु नये असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीता संदर्भाधीन क्रमांक ४ वरील शासन

परिपत्रकान्वये सुचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन परिपत्रकातील सुचना "राजर्षी छत्रपती शाहु महाराज राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरीता देखील लागु राहतील.

४. सदर शासन परिपत्रक संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि संचालक, आयुष संचालनालय यांनी त्यांच्या अखत्यारीतील महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे व सदर परिपत्रकातील सुचनांचे संबंधीत महाविद्यालयांकडुन काटेकोर पालन होईल याबाबत खातरजमा करावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०३१५१७३४७६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], serialNumber=[illegible], cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2018.05.09 15:48:23 +05'30'

(सुरेन्द्र प्र. चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.

मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई

मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सह/उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका)
अधिष्ठाता/ प्राचार्य, सर्व शासकीय/महानगरपालिका / अनुदानित / खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान महाविद्यालये.
निवड नस्ती ( कार्यासन शिक्षण-२).

(९) —

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०८ जुलै, २०२४.

संदर्भ: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/ तांशि-४, दि.३१.०३.२०१६.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण -१, दि.३१.०३. २०१६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.०६.०४.२०२३

**प्रस्तावना :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषि व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्त्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विचाराविनिमयाअंती पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -:** राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस,

शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांकडून आर्थिक तरतूदी सुधारीत करुन, सदर योजनेचा निधी हा संबंधित प्रशासकीय विभागांच्या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात यावा. तसेच, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क लाभाच्या अंमलबजावणीकरिता सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार स्वतंत्र आदेश निर्गमित करावे.

४. मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करतांना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रा ऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारीत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

आ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. संबंधित प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे त्यांच्या शासन निर्णयांमध्ये सुधारणा करावी. याव्यतिरिक्त योजनेच्या अन्य अटी-शर्ती व कार्यपध्दती कायम राहतील.

७. सदर शासन निर्णय हा दि.०५.०७.२०२४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(सतीश तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
५. मा.सभापती/उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
१३. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१६. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१७. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
१८. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
१९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२७. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२९. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
३०. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३३. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३४. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
३५. महालेखापाल - १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३६. महालेखापाल - १ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४०. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४१. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४२. सर्वसंबंधित कार्यासने (तांशि-३/विशि-३/मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४३. निवडनस्ती/तांशि-४.

आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १९ जुलै, २०२४.

वाचा: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि.१४.०२.२०१८.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८.०७.२०२४.

शासन परिपत्रक : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रकियेद्वारे / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. आतापर्यंत व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना (मुले व मुली) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात येत होती. परंतु, उपरोक्त वाचा क्र.०३ येथील शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित वरील प्रवर्गातील मुलींना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ५० टक्के ऐवजी १०० टक्के शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच, ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी, असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना वाचा क्र.०२ येथील परिपत्रकान्वये यापूर्वी दिलेल्या आहेत. असे असतानाही राज्यातील काही शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरत असल्याच्या किंबहुना शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थी, पालक, विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त होत आहेत.

३. वरील पार्श्वभूमीवर आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देताना, त्यांच्याकडून शिक्षण शुल्क न आकारण्याबाबत शैक्षणिक संस्थांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्यावेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेऊन, त्यांना प्रवेश देण्यात यावा.

२) शैक्षणिक संस्थांनी योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देऊन, संबंधित योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरण्याबाबत कळवावे.

४. आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काच्या रकमेचा भरणा करावा.

५. संबंधित संचालनालयाने परीक्षा शुल्काची रक्कम योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या आधार-संलग्नित बँक खात्यात थेट जमा करावी. तसेच, शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करावी. प्रवेशाच्यावेळी संस्थांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास, सदर रक्कम संस्थेने विद्यार्थ्यांना परत करावी.

६. वरील सूचना संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व संचालक, कला संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या तसेच, विद्यापीठांच्या निदर्शनास आणून, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश द्यावेत. सदर सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुध्द कारवाई करावी.

७. संबंधित संचालकांनी सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी. तसेच, संचालनालयांच्या संकेतस्थळावर हे परिपत्रक प्रसिध्द करावे.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७१९१८५७३३५४०८ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SHAHAJAHAN
SHAKUR MULANI

(शहाजहान मुलाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
८. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
९. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१०. सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
११. अवर सचिव (मशि-२ व तांशि-६), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती/तांशि-४.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ.पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना व इतर शिक्षण शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी पोर्टलमधून काढण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १४ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ: १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक १५.४.२०१७.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.३३२/ तांशि-४, दिनांक ७.१०.२०१७.
३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१, दिनांक ८.१२.२०१७.

प्रस्तावना:-

विविध विभागांच्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क / परीक्षा शुल्क योजनांतर्गत लाभाची रक्कम पात्र विदयार्थ्यांना देण्यासाठी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केले आहे. सदर महाडीबीटी पोर्टलवर काही विदयार्थ्यांना अर्जाची नोंद करण्यास अडचणी येत आहेत. त्याचबरोबर महाविदयालयांकडून विदयार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज शासकीय कार्यालयांकडे पाठविण्यास अडचणी येत असल्याने आणि सन २०१७-१८ च्या पहिल्या सत्रासाठी सदरहू पोटलचे पूर्णत: कार्यन्वयन होणे बाकी आहे त्यामुळे विविध विभागांनी संदर्भिय शासन निर्णयान्वये विहित केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादि योजनांच्या प्रदानांची रक्कम डिबीटी पोर्टलव्दारे विदयार्थ्यांना उपलब्ध करण्यास काही अवधी लागणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यानुसार विविध विभागांच्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती / फ्रीशिप योजना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता महाडीबीटी पोर्टल मधून वगळण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक २१/११/२०१७ रोजी घेतलेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. सदर प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या कार्यवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग यांच्या योजना महाडीबीटी प्रणालीतून वगळण्यात व त्याची

अंमलबजावणी ऑफ-लाईन पध्दतीने करुन आधार संलग्नीत बँक खात्यात लाभ अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील विविध शिष्यवृत्ती योजना देखील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विदयार्थ्यांकरीता असलेल्या तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना आणि उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व विविध शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. हया शिक्षण शिष्यवृत्ती / निर्वाह भत्ता योजना पूर्वीप्रमाणेच तंत्र शिक्षण संचालनालयाने व उच्च शिक्षण संचालनालयाने विहित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे राबविण्यात येतील. तथापि लाभाची रक्कम विदयार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल. त्याकरिता महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम,२०१६ च्या कलम ३ मधील तरतूद याकरीता विचारात घेण्यात येईल.

३. विशेष चौकशी पथकाने कारवाईसाठी शिफारस केलेल्या दोषी संस्था व अनुज्ञेय नसलेले अभ्यासक्रम वगळण्यात येतील.

४. सदर प्रयोजनासाठी महाडीबीटी पोर्टलवर विदयार्थ्यांनी भरलेला डेटा (अपलोडेड फाईल्स वगळून) माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून उपलब्ध करुन घेण्यात येईल.

५. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता आधार संलग्नित बायोमेट्रीकक उपस्थितीच्या अहवालाऐवजी संस्थांकडे असलेली उपस्थितीची माहिती / पुरावा ग्राहय धरण्यात येईल.

६. तंत्र शिक्षा संचालनालयाकडून या प्रयोजनासाठी पूर्वीची यंत्रणा /एजन्सी यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतील.

७. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून विदयार्थ्यांच्या आधार क्रमांकाची सत्यता (ऑथेंटिकेशन) पडताळण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे आवश्यक ते सहकार्य घेण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०२१४१३१८१६३५०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2efbf911362ca57b361b7f36471cb[illegible]47e7d e8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2018.02.14 13:24:13 +05'30'

( म.मा.मोरवे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, (माहिती तंत्रज्ञान),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव (प.दु.म), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
१५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
१६. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१७. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१८. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

२०. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२१. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२२. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२६. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२७. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२९. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
३०. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
३१. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.मागणगांव, जि.रायगड
३२. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३४. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३५. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३६. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
३७. सर्व जिल्हाधिकारी
३८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४३. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४४. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४५. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४६. कक्ष अधिकारी(मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
४७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४८. निवडनस्ती/तांशि-४